<u>तक्रार यु.एल.पी. ३१/२०२०</u> <u>नि. सी—०३</u>

<u>सरतपासणी श्री बी. एम. पाटील, अधिवक्ता, गैरअर्जदारा तर्फे:—</u>

१३. मी माझे पुराव्यात दाखल केलेले शपथपत्र तेच असून त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे व तो निशाणी सी—०३ वर आहे.

<u>उलटतपासणी, श्री व्ही. एम. कावडे अधिवक्ता, अर्जदारा तर्फे :</u>

१४. मी माझे पुराव्या सोबत नवीन कोणतेही दस्ताऐवज दाखल केलेले नाही. मी विना तिकीट प्रवाशांकडून २०० रुपये दंड वसूल केला. सदर दंड वसूल केल्याबाबत माझे प्रतिज्ञापत्राात नमूद नाही. सदरील दंड वसूल केल्याची पावती मी अभीलेखावर दाखल केली नाही. हे म्हणने खरे आहे की ९० रुपये तिकीट असताना २०० रुपये दंड वसूल केल्यामुळे गैरअर्जदार यांना ११० रुपयाचा फायदा झाला. बस तपासल्यामुळे गैर अर्जदाराचे नुकसान झाले नाही. हे म्हणने खरे नाही की तक्रारकर्ता याने कोणतेही गैरकृत्य केले नाही, व मी तक्रारदाराविरुध्द खोटा अहवाला दिला. तकारकर्ता याने अपहार केला नाही. हे म्हणने खरे नाही की, मी खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे व खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पूर्ण झाला.

फेर तपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

(रविकांत तु. साखरे)
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, चंद्रपूर.

दिनांक २९/०४/२०२६